Awesome Issue -2
Club Id: 53964

THE MAGIC OF ROTARY

Rotary District 3142

Rotary Badlapur Industrial Area

Awesome

**ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA,BADLAPUR**

August ,2024

Dist.: 3142

# NIRMAN

E-BULLETIN




Rtn. Vaibhav Lawate
Club President
2024-2025

Rtn. Amit Padhye
Club Secretary
2024-2025

Rtn. Dr.Amol Ubale
Bulletin Editor
2024-2025

# Table of Contents


| | |
|---|---|
| *District Governor's Message* | 01 |
| *Awesome President's Message* | 03 |
| *Editor Desk- Why Join Rotary* | 05 |
| गोष्ट एका परदेश गमनाची..!!! - रघुनंदन चुरी | 07 |
| ऊतराई - राजीव दिवाण | 09 |
| *Long Distance Friendship - Barfi* | 11 |
| ओळख नवरत्नाची- विलास वाखारे | 12 |
| खाद्य मैफिल रवा केक - प्रिया शिरसाठ | 14 |
| कल्पकतेच्या दुनियेत | 15 |
| *Awesome Year District Officers* | 16 |
| *Installation Ceremony* | 17 |
| *Assembly and Weekly Meetings* | 18 |
| *BOD Meetings* | 19 |
| *Projects Glimpses-July2024* | 20 |

# NIRMAN

*CLUB E- BULLETIN -ROTARY CLUB OF BADLAPUR INDUSTRIAL AREA*

***Awesome Issue -II***
***Club Id: 53964***
***Dist.: 3142***

***August,2024***

***@Author***
*All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, including photocopying, recording,or other electronic or mechanical methods, without the prior written permission of the publisher, except in the case of brief quotations embodied in critical reviews and certain other non-commercial uses permitted by copyright law.*

***Publisher :Rotary Club of Badlapur Industrial Area,Badlapur***
***Contact Information :***
***Email: rcbia2023@gmail.com Phone : +91 9320071689***
***Website: www.rcbadlapurindustrialarea.rotaryindia.org***

Dear Fellow Rotarians,

As we prepare to usher in the second month of this Rotary Year, let us reflect on our recent achievements and look ahead to the opportunities before us. Your enthusiasm and dedication continue to inspire and drive our collective efforts toward creating a positive impact.

"You're off to great places! Today is your day! Your mountain is waiting, so get on your way." We did. July was a month of remarkable achievements.

**1st July: ANNAPURNA Initiative**

We kicked off the Rotary Year with our Annapurna Initiative, where we served meals to over 9000 people throughout our Rotary District. This act of service not only addressed immediate hunger issues but also showcased our commitment to alleviating food insecurity in our communities. Ann Veneman, Executive Director of UNICEF, says, "Few things have more impact than nutrition on a child's ability to survive, learn efficiently, and escape a life of poverty."



**7th July:**
**District Governor Installation**

I am honored to have officially assumed the role of District Governor of Rotary District 3142 on the 7th of July. The Installation Ceremony was a testament to our unity and shared vision for the year ahead. I am grateful for the support and the implicit trust you have placed in me. That same evening, at an event organized at Hotel Satkar Residency, we felicitated Rotarians who pledged contributions of US$ 1000 and more at the hands of P.R.I.D. K.R. Ravidran.

**21st July: Blood Collection Drive**

Our Blood Collection Drive was a tremendous success, with numerous Rotarians and community members braving the heavy rains to come together and donate blood. We collected over 1500 units. As a blood donation slogan so poignantly points out, "A mother's tears cannot save her child's life, but your blood can."

This initiative significantly contributes to saving lives and meeting the urgent needs of the healthcare system.

Throughout July, I have had the honor and privilege of being invited as Chief Guest at the installation ceremonies of Rotary Clubs in all parts of the District. This has provided me with an opportunity to meet Club Members and learn about the community service projects and CSR initiatives taken up by these Clubs. It is where I see the magic of Rotary happening.

August in Rotary is designated as Membership and New Club Development Month.

Membership is the lifeblood of our organization, and this month provides an excellent opportunity to celebrate the values of our members, showcase the global impact of Rotary, and infuse new blood by inviting deserving individuals to serve the community and enjoy the fellowship of kindred souls by joining Rotary.

I encourage each Club to actively engage in recruiting new members while retaining current ones. We need to emphasize the benefits of Rotary membership, including the opportunity to make a difference, build lasting friendships, and develop personal and professional skills. Let us work to create an inclusive and welcoming environment for all.

In addition, consider innovative ways to establish new clubs in areas that can benefit from Rotary's presence. By expanding our reach, we can grow our outreach and extend and amplify the impact of our service. Together, we can strengthen our organization and continue to serve our communities with dedication and passion.

"What really matters from the point of view of social capital and civic engagement is not merely nominal membership but active and informed membership."

Thank you for your unwavering commitment and service.

Yours in Rotary Service,

**Dinesh Mehta**

**District Governor**

नमस्कार, सर्वांना रोटरी प्रणाम 🙏🏼

आज ऑगस्ट महिन्यातील दुसरे बुलेटिन सादर करताना अत्याधिक आनंद होत आहे. रोटरी क्लब बदलापूर इंडस्ट्रियल एरिया रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करत असताना या रोटरी वर्षाचा अध्यक्ष होण्याचा बहुमान मला मिळाला , ही संधी मला दिली त्याबद्दल मी आमच्या रोटरी क्लबच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करतो आणि त्यांच्या माझ्या प्रती असलेल्या अपेक्षा पूर्ण होतील असे आश्वासन देतो.
नवीन रोटरी वर्षाची सुरुवात एक जुलै रोजी झाली आणि पहिल्याच दिवशी अन्नपूर्णा दिनाच्या निमित्ताने बदलापूर परिसरातील दोन वृद्धाश्रम बेंडशिळ आणि मुळगाव येथील वृद्धांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले,किमान पंधरा दिवस पुरेल एवढे साहित्य प्रथम महिला सौ. श्रद्धा लवाटे यांच्या सौजन्यातून करण्यात आले.याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. यापुढे दर महिन्याला विशिष्ट दिवशी अन्नपूर्णा दिन आपल्या क्लबच्या माध्यमातून साजरा करण्यात येणार आहे.
त्यानंतर चार जुलै रोजी बदलापूर पूर्व येथील एम.जे स्कूल येथे चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थिनींना गुड टच - बॅड टच आणि मासिक पाळी विषयी समज गैरसमज याविषयी अतिशय सुंदर मार्गदर्शन आपल्या क्लबच्या रोटरी अँन आणि प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ.सौ. अश्विनी कवठणकर यांनी केले.
सहा जुलै रोजी अधिकृतपणे अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा कृष्णा पॅलेस सुदामा हॉटेल, येथे अतिशय दिमाखात संपन्न झाला. बदलापूर परिसरातील विविध मान्यवरांनी आणि क्लबच्या सर्व सदस्यांनी सहकुटुंब या सोहळयाला उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी अध्यक्ष श्री नितीन महाजन यांनी केले आणि सर्व तांत्रिक बाबी सदस्य श्री सतीश साळवणकर आणि श्री किरण शेवाळे यांनी अतिशय उत्तम प्रकारे सांभाळल्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यामागे सर्व सदस्यांनी मोलाचा सहभाग दर्शवला.



या सोहळ्याचा उत्साह अतिशय अवर्णनीय होता यावरूनच हे वर्ष अतिशय दिमाखात जाणार आहे अशी भावना माझ्या मनात येऊन गेली. सर्व सदस्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे मन:पूर्वक आभार. आणि या निमित्ताने वर्षभर होणाऱ्या विविध उपक्रमांमध्येही सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर पर्यावरण संवर्धनाच्या अंगभूत जिल्हा परिषद शाळा, देवळाली येथे वृक्षारोपण करण्यात आले . शाळेच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी या वृक्षांचे संवर्धन करण्याची ग्वाही आम्हाला दिली त्याबद्दल आम्ही सर्व उपकृत आहोत.

**आषाढी एकादशी** - वारकरी आणि दिंडी हे समीकरण वर्षानुवर्ष जणू रूढच आहे. त्यानिमित्ताने आमच्या क्लबच्या महिला मंडळी , बाळ गोपाळ वारकरी या दिंडीत उत्साहाने सहभागी झाले आणि बदलापूर पश्चिम येथे अभंग गायन, वारकरी दिंडी असा सुंदर सोहळा त्यांनी एकादशीच्या निमित्ताने साजरा केला.

**रक्तदान हेच श्रेष्ठदान , एक बूंद जिंदगी की** असं ज्याप्रमाणे म्हणतो ते खरोखरच .आम्ही बदलापूर मधील चारही रोटरी क्लब एकत्र येऊन रक्तदान शिबिर आयोजित केले आणि अतिशय दुर्धर अशा थैलेसेमिया या रोगाचे निदान ब्लड टेस्ट चा माध्यमातून या निमित्ताने केले गेले. निश्चितच अपघात किंवा अडचणीच्या प्रसंगी रक्तदान शिबिरे ही सर्व रुग्णांच्या उपयोगी येतील हे निश्चित.

शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण कौशल्य,सभाधीटपणा वाढवा यासाठी बदलापूर परिसरातील 15 शाळांमधील 33 विद्यार्थी आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झाले आणि एकापेक्षा एक सरस अशा उत्तम शैलीतून त्यांनी आपली भाषणे सादर केली.

खरोखरच कुणाला प्रथम क्रमांक द्यावा आणि कोणाची निवड करावी हे परीक्षकांसाठी निश्चितच आव्हानात्मक होतं.

शेतीतून समृद्धीकडे आणि समृद्धीतून राष्ट्रहिताकडे भारत देश प्रगती करत आहे आणि आपला शेतकरी यामध्ये मोलाचा सहभाग देत आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो. याचाच एक भाग म्हणून बदलापूर गावात सर्व सदस्यांनी भातलावणी हा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा केला आणि वनभोजन, पावसाळी सहल असा सर्व आनंद यामधून आमच्या सर्व क्लब सदस्यांना घेता आला.

हुश्श .....

असं करता करता जुलै महिना कधी सुरू झाला आणि कधी संपला हे कळलच नाही.

आपल्या क्लबच्या सर्व मीटिंग असो कुठलाही प्रोजेक्ट असो आपले सर्व सदस्य अतिशय उत्साहात आणि हिरीरीने सहभागी होतात हे दिसून आले. असाच उत्साह आणि सहभाग वर्षभर राहावा अशी मी अपेक्षा करतो आणि तूर्तास पूर्णविराम घेतो .

इति लेखन समाप्ती...

**रो.वैभव लवाटे**

अध्यक्ष 24-25

# Editor Desk- Why Join Rotary

Joining Rotary International offers a unique opportunity to make a positive impact in your community and the world. Rotary is a global network of 1.4 million neighbors, friends, leaders, and problem-solvers who unite and take action to create lasting change.Here is some information about Rotary membership.

PROUD MEMBER Rotary

**Benefits of Rotary Membership**

Community Service: Rotary clubs focus on local and global service projects. Members have the opportunity to engage in initiatives that improve health, support education, and promote peace.

**Networking Opportunities:** Rotary provides a platform to connect with a diverse group of professionals and community leaders, fostering both personal and professional growth.

**Leadership Development:** Members can enhance their leadership skills through involvement in club activities and service projects. Opportunities to take on leadership roles within the club and at the district level are also available.

Global Impact: As part of an international organization, Rotary members contribute to global projects, such as eradicating polio, promoting clean water and sanitation, and supporting economic development.

**Fellowship and Friendship:** Rotary clubs are known for their camaraderie. Members form lasting friendships while working together toward common goals.

**How to Join Rotary**

**Find a Club:** Locate a Rotary club near you by using the club locator on the Rotary International website or contacting local clubs directly.

Attend Meetings: Prospective members are encouraged to attend meetings or events to get a sense of the club's culture and activities.

**Express Interest:** Let club members know you are interested in joining. They can provide information about the membership process, requirements, and expectations.

Membership Application: If you decide to join, you will need to complete a membership application and may be asked to meet with club leadership for an interview or orientation.

**Induction:** Once accepted, new members are formally inducted into the club, which often involves a ceremony welcoming them to the Rotary community.

**Commitment and Responsibilities**

**Active Participation:** Members are expected to participate in club meetings, events, and service projects regularly.

**Financial Contributions:** Membership dues vary by club and help support club operations and Rotary International's global initiatives.

**Service Above Self:** Rotarians uphold the motto "***Service Above Self***" and commit to ethical standards in both personal and professional life.

**Rotary's Areas of Focus**

Rotary's projects and initiatives often center around six key areas:

***Promoting Peace***

***Fighting Disease***

***Providing Clean Water, Sanitation, and Hygiene***

***Saving Mothers and Children***

***Supporting Education***

***Growing Local Economies***

Rotary membership is a rewarding experience that allows individuals to contribute to meaningful change while building connections with like-minded people across the globe.

**Dr.Amol ubale**



# " गोष्ट एका परदेश गमनाची..!!! "

मी जेव्हा १९६४ साली उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेलो तेंव्हा ही बाब इतकी दुर्मिळ होती कि, मराठी वर्तमानपत्रामधे माझ्या फोटोसह बातमी प्रसिद्ध झाली होती. विशेष म्हणजे परदेशी शिक्षणाचा योग आला ,त्याला कारणीभूत म्हणजे १९६२ चे चीन युद्ध ...!!! त्याचं कारण म्हणजे, त्याकाळी हिमालयीन वातावरणात थंडी पासून बचाव करु शकणारे लोकरीचे गरम कपडे भारतीय सैन्याकडे नव्हते. असं म्हणतात,कि प्रत्यक्ष युध्दात शहीद झालेल्या सैनिकांपेक्षा, थंडीत गारठुन मृत पावलेल्या सैनिकांची संख्या अधिक होती. योग्य ते कपडा बनवणा-या कापड गिरण्या नव्हत्या. तेव्हा असे ठरले कि, युद्ध सामुग्री तयार करणाऱ्या यंत्रणेबरोबरच लोकरीचे गरम कपडे बनविणारी यंत्रणा उभी करावी.

उत्तम प्रकारची लोकर तर आणली ऑस्ट्रेलिया मधून पण तंत्रज्ञानाचे काय? म्हणून तंत्रज्ञ, कारागिर, यंत्रे उपलब्ध करून द्यावयाची. त्यासाठी संपूर्ण भारतातून तीन तांत्रिक सल्लागार परदेशातून प्रशिक्षित करून आणायचे .ह्या तीन लोकांत आमचा क्रमांक लागला.आम्हा तीघांना इंग्लंड मधील लीड्स शहरातील विश्वविद्यालयात पाठवायचे ठरले.

त्यापूर्वी माझे B.Sc Chemistry , B.Sc Tech Textile (पहिला क्रमांक) आणि M Sc. Textile by Research झाले होते.

आधी सांगितल्याप्रमाणे निवड तर झाली पण, तिघेही सामान्य मध्यम वर्गीय,ना कुठल्याही प्रकारची पाश्चिमात्य संस्कृतीशी परिचय ...ना पाश्चिमात्य पार्श्वभूमी लाभलेली.जेम्स बॉण्ड चे दोन- तीन चित्रपटामुळे पाश्चिमात्य संस्कृतीची जेवढी माहिती मिळाली तेवढीच.डॉ.नो चित्रपटातील उर्सुला ऐन्ड्रेसा नटीचे शॉर्ट्स पाहून गैरसमज डोक्यात भरलेले.

सध्या जगभर खाद्य पदार्थ,कपडे, संगीत यांची सरमिसळ Hybridization झालेलं दिसतं. ही परिस्थिती तेव्हा नव्हती.

पाश्चात्य संस्कृतीशी परिचय नसताना आम्ही इंग्लंडला एके दिवशी विमानाने येऊन थडकलो.विमान प्रवासाची नवलाई असल्याने २५-३० लोकं हार- तुरे घेऊन विमानतळावर निरोप द्यायला आले होते. विमानतळावर आमचे स्वागत करून लीड्सला आम्हाला गाडीने नेण्यासाठी घेऊन जाण्यासाठी खास लोकं आले होते. लीड्सला आमची सोय एका शाही वसतीगृहात केली होती. पण तिथले ते भपकेबाज वातावरण, पाश्चात्य प्रकारचे जेवण, दर शनिवारी नृत्यासह पार्टी ...ह्यात आम्ही बुजून गेलो तर नवल ते काय?

दुपारी ३ वाजता होणारा सुर्यास्त, सोडियम व्हेपरचे  पिवळ्या रंगाचे रस्त्यावरचे दिवे त्यामुळे वातावरणात उदासपणा भरलेला वाटत असे. आणि त्याचा परिणाम पौर्वात्य देशांतून आलेल्या विद्यार्थ्यांवर जाणवत असे.ब-याच मुलांना वैद्यकीय सल्ला देण्याची गरज पडली होती....त्यामधे मी ही एक होतो. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर दिलेला वैद्यकीय सल्ला मात्र फारच गजबचा होता. त्यांनी मोठ्या प्रेमाने सांगितले कि, Mr. Churi, there's nothing wrong with your health. All you need is companionship, especially with opposite sex. Go and mix with people .इतका रोमॅन्टीक सल्ला भारतातील डॉक्टर देतील का ?

सद्यस्थितीत नृत्य जोडीने पार्टी करणे, हा सर्व सामान्य प्रघात आहे . तत्कालीन परिस्थितीत स्त्री - पुरुष इतक्या सलगीने वागणे.....
केवळ अब्रम्हण्यम्...!!!

**© रघुनंदन चुरी**

१ ते ७ ऑगस्ट....हा आठवडा " जागतिक स्तनपान दिन " मानला जातो. स्तनपान आमचे महत्त्व ....खास करून पाश्चात्य देशातील महिलांना कळालं ह्या उद्देशाने,ह्या आठवड्यात जनजागृती केली जाते... दुर्दैवाने...आता भारतामधे सुध्दा त्याची गरज भासू लागली आहे. आपलं बाळ रडू लागलं,कि कोणतीही आई त्याला छातीशी घेते.....का???
कवयित्री बहिणाबाई चौधरी जर आज असत्या...तर..त्यांचं मनोगत कसं असतं??..माझा एक प्रामाणिक प्रयत्न, त्यांच्या काव्यशैलीमधे शब्दबद्ध करण्याचा...!!!
जर काही चुकलं असेल..तर ती माझी चूक ..आणि..जर आवडलं... भावलं..तर...सर्व माता आणि बहिणाबाईंचा मला आशिर्वाद लाभला..असे मी मानेन...

बाळ रडता, रडता
माये जीवा लागे घोर
धरी लेकरा छातीशी
तवा शांत होई पोर ||१||

ठकठक काळजाची
बाळा वाटते ओळखी
त्येला जाणवे कुस ती
जवा व्हता पोटामंदी ||२||

नऊ महिने बाळानं
ऐकीयली ठकठक
येता जगामंदी या
मग पाही टकमक. ||३||



ओठ लाऊनी स्तनाला
बाळ करी चुरूचुरू
तवा मायेच्या डोळयात
लागे पाणी झुरूझुरू.||४||

माय मिटते गं डोळे
मनी समाधान जाले
एवढ्याश्या धारेने
पोट बाळाचे भरले..||५||



कुण्या जन्माची पुण्याई
बाळा झाले तुझी आई...
मनी कळेना रे मला
कशी होऊ ऊतराई...||६||

© राजीव दिवाण




**MDRT-USA WEALTH MANAGER**

**हे जागतिक मानांकन प्राप्त केल्याबद्दल सेक्रेटरी अमित पाध्ये यांचे अभिनंदन**

# *Long Distance Friendship - Barfi*

NIRMAN

*If I tell the waves here on this shore,*
*Will they travel 10,031 kms to deliver my msg to you?*

*The often neglected ruins*
*Generally belong to friendships,*
*I have been studying them*
*For the past few months,*
*Wondering if I will ever find ruins*
*With our names carved on it.*

*My thoughts whirlwind*
*And find anxiety to cling on to,*
*You aren't here*
*To tell me that I am stupid!*

*"Don't let her get hurt when I can't be there with her",*
*"Don't let anyone replace me",*
*"Please let there be someone to take care of her"*
*Are the coins that I throw in the wishing Well.*

*No one will ever understand our language,*
*Or the depth of our silences,*
*No one will ever know why I smile so wide when I see a cement mixer,*
*Or why I love bulls with big beautiful horns.*

*And even after months apart,*
*When I suddenly turn to you*
*To tell you about the silly cat that ran away with fish,*
*Your absence becomes the most tangible thing around me.*

*And while we struggle*
*With this banal reality,*
*I will keep dreaming about our lives*
*As cool old ladies living our best life in the same old age home.*

*And Mon Amie,*
*Oceans to desserts, beaches to mountains,*
*I will cross all and I will meet you in a yellow bus on the fourth seat.*

**~Barfi!**

नमस्कार मित्रानो. मी विलास वखारे. मागील महिन्यात मी आपल्या परिवारात म्हणजेच रोटरी क्लबच्या बदलापूर इंडस्ट्रियल एरिया च्या शाखेत सामील झालो.
माझं पहिली ते दहावी पर्यंत चे(१९७० ते १९८०) शिक्षण डोंबिवलीतील स. वा. जोशी हायस्कूल मध्ये झालं. त्यावेळेस राहायला डोंबिवली ला होतो.
अकरावी  ला विज्ञान शाखेत डोंबिवलीच्या के. वी. पेंढारकर कॉलेज मध्ये प्रवेश घेऊन १९८५ मध्ये रसायन शास्त्रात B.Sc पूर्ण केली आणि १९८७ मध्ये M.Sc ऑरगॅनिक केमिस्ट्री चांदीभाई कॉलेज उल्हासनगर  मधून पूर्ण केली.
Postgraduate झाल्यावर जवळपास दोन अडीच वर्ष एका छोट्या कंपनीत संशोधन विभागात काम करून १९८९ साली BASF R & D मध्ये रुजू झालो. जवळपास ३१ - ३२ वर्ष कार्यरत राहून शेवटी २०२१ मध्ये निवृत्ती घेतली.
लहानपणापासून मला का कुणास ठाऊक पण इलेक्ट्रॉनिक्स मध्ये आवड निर्माण झाली होती, पण त्यावेळी योग्य मार्गदर्शन न होऊ शकल्याने इलेक्ट्रॉनिक्स ऐवजी रसायन शास्त्राकडे वळलो. ती खंत मनात राहून गेली होती त्यामुळे रिटायर्ड झाल्यावर जे आपल्या बाबतीत घडलं ते आजकालच्या मुलांच्या बाबतीत व्हायला नको असं सतत वाटत असे, म्हणून रिटायर्ड झाल्यावर पूर्णवेळ मुलांसाठी द्यावा असं ठरवलं आणि त्यातूनच मग बेसिक आणि ऍडव्हान्स इलेक्ट्रॉनिक कार्यशाळेची कल्पना सुचली.
बदलापूर आणि बदलापूर च्या बाहेर शाळांमध्ये कार्यशाळा घ्यायला मिळतात हयाचा खुप आनंद होतो व समाधानही मिळते .
या क्षेत्रात मला सुरवातीला श्री. प्रवीण हेर्लेकर सरांनी खुप प्रोत्साहन दिले त्या बद्दल मी त्यांचा कायम ऋणी राहीन. त्यांच्या टॅलेंट फौंडेशन तर्फे १९९८ पासून दर वर्षी उन्हाळयात छंद वर्ग भरत असे. त्यात इलेक्ट्रॉनिक्स चे क्लासेस मला घ्यायला मिळायचे तेव्हापासून मुलांना इलेक्ट्रॉनिक्स विषयी  प्रात्यक्षिक घेऊन ज्ञान द्यायची संधी मिळत गेली .
तसेच बदलापूर मधे राहणारे इंजिनिअर श्री सुधीर शिरसाट सर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ सुचेता शिरसाट मॅडम ( रिटायर्ड मुख्याध्यापिका- आदर्श मराठी मिडीयम शाळा ) ह्यांची मला खुप मदत झाली आणि अजूनही होत आहे त्या बद्दल त्यांचे  मनापासून आभार.
मला या कार्यशालेव्यतिरिक्त  पुस्तकं वाचणे, कॅरम खेळणे, नवीन रेसिपीस ट्राय करणे, वेगवेगळया पद्धतीची चोकोलेट्स बनवणे, वेगवेगळया ठिकाणी फिरायला जाणे, वेगवेगळया cutouts design चा वापर करून गणपती फ्रेम्स बनवणे इत्यादीची आवड आहे.

माझी बेस्ट हाफ उन्नती पुण्याची. तिने मायक्रोबियॉलॉजि मध्ये BSc केलंय. लग्नाअगोदर ती पुण्यातील रुबी हॉल हॉस्पिटल मध्ये कार्यरत होती.

लग्नानंतर (१९९१) बदलापूर ला आल्यावर तिला पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट मध्ये अलिबाग ला नोकरीं लागली होती पण मुलगा विनय काही महिन्यांचाच असल्याने जॉब सोडावा लागला.

घरीच शिकवणी चालू करून तिने घराला हातभार तर लावलाच पण तिने गरीब आणि होतकरु मुलांना फी न घेता आनंदाने शिकवून वेळेचा सदुपयोग देखील केला आणि अजूनही करत आहे.

मला माझे छंद जोपसता आले त्याचे सर्व श्रेय तिच्याकडे जाते.

आमचा मुलगा विनय याने इकॉनॉमेट्रिक्स मध्ये रूपारेल कॉलेज मध्ये MA पूर्ण केले आणि MPSC मध्ये त्याची क्लास २ ऑफिसर म्हणून तो सध्या बांद्रा ऑफिस मध्ये कार्यरत आहे.

सून किमया हिनेही त्याच विषयात MA करून सध्या ती सारस्वस्त बँकेत ऑफिसर म्हणून हेड ऑफिस मध्ये कार्यरत आहे. त्यांचा मुलगा, आमचा नातू विराजस चार महिन्यांचा आहे.

आमची मुलगी वैभवी हिने जर्मन भाषेत मुंबई विद्यापीठातून MA केले आहे आणि सध्या ती जर्मनीत डिजिटल मार्केटिंग मध्ये डिग्री करत आहे.

रोटरी क्लब चा प्लॅटफॉर्म खुप मोठा असल्याने आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो, कि आम्हाला रोटरी द्वारे सामाजिक ऋण फेडायची एक उत्तम संधी मिळाली आहे. उर्वरित आयुष्य ह्याच कामासाठी व्यतीत करायचा आमचा मानस आहे.

ज्यांच्यामुळे आम्ही ह्या परिवारात सामील होऊ शकलो ते विनोद जी, नितीन जी, कपिल जी, अमोल जी, वैभव जी आणि अमित जी ह्या सर्वांचे आम्ही खुप खुप आभारी आहोत. धन्यवाद.

रवा केक ही एक लोकप्रिय आणि स्वादिष्ट मिठाई आहे जी रवा (सूजी) पासून बनवली जाते. ही केक बनवायला सोपी आणि जलद तयार होणारी आहे. खाली दिलेली साधी रेसिपी वापरून तुम्ही घरीच रवा केक बनवू शकता.



प्रिया शिरसाठ

**साहित्य:**

- - 1/2 कप दही
- - 6 टेबलस्पून तूप
- - 1 कप साखर
- - 1 कप दूध
- - 1+1/4 कप रवा
- - 1/2 कप गव्हाचे पीठ
- - 1+1/2 टीस्पून बेकिंग पावडर
- - 1/4 टीस्पून बेकिंग सोडा
- - चिमूटभर मीठ
- - 1 टीस्पून वॅनिला इसेन्स

**कृती:**

१. मोठ्या बोलमध्ये 1/2 कप दही आणि 6 टेबलस्पून तूप घेऊन एकजीव होईपर्यंत मिक्स करा.

२. त्यात 1 कप साखर, 1 कप दूध, आणि 1+1/4 कप रवा व्यवस्थित मिक्स करा. हे मिश्रण 30 मिनिटे झाकून ठेवा.

३. नंतर त्यात 1/2 कप गव्हाचे पीठ, 1+1/2 टीस्पून बेकिंग पावडर, 1/4 टीस्पून बेकिंग सोडा, चिमूटभर मीठ, आणि 1 टीस्पून वॅनिला इसेन्स टाकून चांगले एकजीव करा.

४. बेकिंग टिनला तुप लावून ग्रीसिंग करणे आवश्यक आहे. यामुळे केक बेकिंगच्या वेळी टिनला चिकटत नाही आणि केक सहज बाहेर निघतो. ग्रीसिंग केल्यावर, तुम्ही थोडंसं मैदा किंवा रवा टाकून टिनला हलकं फडकून घ्या. यामुळे केक टिनमध्ये व्यवस्थित बसेल आणि त्याला सुटणं सोपं जाईल.

५. ओव्हन 180 डिग्रीवर गरम करा आणि हा बेकिंग टिन 30 ते 35 मिनिटे ठेवा.

६. तयार आहे तुमचा स्वादिष्ट रवा केक!

**टीप: चवदार केकसाठी तुम्ही तुमच्या आवडीचे ड्राय फ्रूट्स या मिश्रणात घालू शकता.**

## रेखाटन



सतीश मेस्त्री



वेदांगा लवाटे



सावी सालवणकर

## फोटोग्राफी







रोहिणी पारस्कर







डॉ.अमोल उबाळे

# Awesome Year District Responsibility

*This year our 6 members are representing District level*



**PP. Milind Khire**
JDS..UDDAN Conference



**PP. Shakuntala Churi**
Avenue Co-chair Zone IV
Impactful Mega project - Vasundhara



**PP Rajiv Diwan**
Avenue Co-chair Zone IV
Youth Services






**PP Shraddha Soman**
Avenue Co-chair Zone IV
Membership Retention



**PP.Vidya Rathod**
Avenue Co-chair Zone IV
International Youth exchange etc



**IPP Kapil Padher**
Av. Co Chair DM Zone IV
PI & PR

# INSTALLATION CEREMONY






















# NEW MEMBER INDUCTION



Shilpa Shinde

Vilas Vakhare



# ASSEMBLY WITH ASST.GOVERNER DR SAGAR  DHADAS



# WEEKLY MEETING ON 17/07/2024









# FIRST BOD MEETING IN AWESOME YEAR- 27 JULY 2024









# ANNAPURNA PROJECT- 01 JUL 2024














# PROJECT : MATERNAL AND CHILD HEALTH









**4 July 2024**



कळी उमलताना-

डॉ.अश्विनी कवठणकर

# PROJECT : TREE PLANTATION














## 14 July 2024



# PROJECT : WARKARI DINDI






17 July 2024








# PROJECT : WARKARI DINDI





17 July 2024







# PROJECT : BLOOD DONATION














21 July 2024






# PROJECT : RICE HARVESTING













**27 July 2024**

# PROJECT : INTERSCHOOL ELOCUTIONOMPETITION











27 July 2024



CS सीटी समोसा ®

Its Really Hot

CS City Samosa

WE ACCEPT ALL TYPES OF PARTY ORDERS

For Order 9075097716 | Also available on zomato







Rahul Kamble
Mob: 9821333348

# Rahul Kamble & Associates

Accounts • Audit • Tax

05 & 06, Shree Sai Dham Apartment, Opp. RBL Bank,
Old DP Road, Badlapur (East) Thane-421503
Email: rahul_0881@yahoo.com

Our Professional Services-

• Accounting • Tax Audit
• GST Audit • Statutory Audit

Other Service-

• Income Tax Returns • GST Registration and GST Returns • RERA Registration • Gumasta Registration
• Udayam Registration • Company Registration




Air Ticket Booking | Domestic Tours | Visa Assistance
International Tours | Passport Assistance | Car Rental

QUALITY™
travel world
क्वालिटी ट्रॅव्हल वर्ल्ड प्रा. लि.

9820678081 / 9833144444
Fort, Mumbai